# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर - वसई-विरार
यांचे कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व,
जि. ठाणे दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


प्रेस नोट :- ३८६/२०२३ दिनांक – ०४/११/२०२३

## मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालयांतर्गत सायबर पोलीस ठाण्याचे उद्‌घाटन तसेच सायबर जागरुकतेकरीता रिल्स स्पर्धेचे उद्‌घाटन.

मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालयांतर्गत सायबर पोलीस ठाण्याचे उद्‌घाटन मा.पोलीस आयुक्त यांचे हस्ते करण्यात आले. तसेच सायबर गुन्ह्यांच्या संदर्भात इन्स्टाग्राम या लोकप्रिय सोशल मिडीया ॲपच्या माध्यमातून जनतेमध्ये जनजागृती होणेसाठी सायबर रिल्स स्पर्धेचे दिनांक ०४.११.२०२३ ते दिनांक ३०.११.२०२३ रोजी दरम्यान आयोजन केलेले आहे. नमूद स्पर्धेतील प्रथम पारीतोषीक विजेत्यास २१००० रुपये, द्वितीय विजेत्यास १५,००० रुपये व तृतीय विजेत्यास ११,००० रुपये व उत्तेजनार्थ ३ स्पर्धकांना प्रत्येकी ५,००० रुपये पारीतोषीक देण्यात येणार आहे. नमूद बक्षिसांची रक्कम ही फक्त मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात वास्तव्य करणाऱ्या स्पर्धकांनांच देण्यात येणार आहे. कार्यक्षेत्राबाहेरील १० विजेत्यांना मा.पोलीस आयुक्त यांचेकडून प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

नमूद स्पर्धेतील रिल्स बनविण्याचे विषय पुढीलप्रमाणे असतील.

१) सायबर गुन्हे (स्मिशींग, फिशींग, फेक प्रोफाईल, इन्व्हेस्टमेंट फ्रॉड, वर्क फ्रॉम होम फ्रॉड/टास्क रिव्हीव फ्रॉड, ऑनलाईन फ्रेंडशिप फ्रॉड, फेक वेबसाईट/युआरएल गुगल सर्च)
२) सेफ बॅकींग संदर्भात जनजागृती
३) सोशल मिडीया सुरक्षितता/सुरक्षित प्रोफाईल.
४) ऑनलाईन सुरक्षितता.
५) युपीआय.सुरक्षितता.

स्पर्धकांनी नामनिर्देशन WWW.reelscompetition.com या वेबसाईटवर करावे. रिल्स बनविण्याच्या नियम, अटी व शर्ती वरील वेबसाईटवर उपलब्ध आहेत.